Vol III Issue X April 2014 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-3 | Issue-10 | April-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# "नागपूरकर भोसल्यांच्या काळातील व्ऱ्हाडातील धर्म सहिष्णूता"

प्रशांत प्र. कोठे

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

**सारांश :-**

राजारामाच्या काळात व्ऱ्हाडात मराठयांचा शिरकाव झाला तेव्हा परसोजी भोसले व्ऱ्हाडात कार्यक्षेत्र म्हणून ठरले. व तेव्हापासून भोसले व्ऱ्हाडात कार्यरत होते. परसोजीचा मुलगा कान्होजी भोसले व त्यानंतर शाहूने सेनासाहेब सुभा म्हणून रघुजी भोसले प्रथम याची नेमणूक केली. त्याने व्ऱ्हाडात जम बसून नंतर नागपूर आपले केंद्र बनवले. या वेळी व्ऱ्हाड हा दक्षिणेतील सहा सुभ्यातील एक सुभा असल्याने व्ऱ्हाडवर निजामाची सत्ता होती यातूनच भोसले व निजाम यांच्यात संघर्श होऊन त्यातून त्यांच्यात साठ चाळीशी चा तह झाला व व्ऱ्हाडात दोअली कारभार सुरू होऊ तो इ.स. 1803 पर्यंत होता. या कार्यात निजामातर्फे त्याचा येथील सूभेदार व कारभारी कार्यरत होते. त्यांच्यातील संघर्श बरोबरच मैत्री संबंधही होते. त्या कार्यातील एकंदर व्ऱ्हाडातील धार्मिक स्थिती कशी होती हे दाखविण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**प्रस्तावना :**

### मुस्लीम धार्मिक स्थळांना हिंदूंचा हातभार :

व्ऱ्हाडच्या धार्मिक धोरणावर प्रकाश टाकतांना महत्त्वाची बाब निदर्शनास येते ती अशी की, व्ऱ्हाडचे मुख्य केंद्र अचलपूर असल्याने तेथील परीस्थिती ही व्ऱ्हाडच्या जीवनावर प्रकाश टाकते. अचलपूरात अनेक धार्मिक ठिकाणांशी हिंदूंचा संबंध आला आहे. ते आपणाला त्या धार्मिक ठिकाणावर असलेल्या शिलालेखांवरून व काही ग्रंथातील नांदीवरून दिसून येते. त्यातील काही महत्त्वाच्या नोंदींचा विचार करता असे दिसते की भोसले व नबाबांच्या धार्मिक सहिश्णू धोरणाचाच तो परिणाम आहे. या भोसले व नबाबांचे हिंदूंशी असलेले सहकार्याचे संबंध आणि त्यातून त्यांच्यात निर्माण झालेली जवळीकता यामुळे त्यांच्या काळात अनेक मुस्लीम धार्मिक ठिकाणांना आणि इमारतींना हिंदूंचा हातभार लागला आहे. "राजश्री सेनाधुरंधर (मुधोजी भोसले) यांची स्वारी आलजपुरास गेली. म्हणून विनंती सेवेशी लिहलीच आहे. तेथे जाऊन रहिमानशाबाबा यांचे दर्शन घेऊन सलाबतखान यांचे घरी जाऊन चार घटका बसले......."[1]

वरील दृष्टीकोनातून नागपूरकर भोसल्यांनी बजावलेली कामगिरी अतिशय महत्त्वाची मानली जाते. एलिचपूरचे नबाब इस्माईलखान पन्ही व नागपूरचे मुधोजी भोसले यांचे मित्रत्वाचे संबंध होते आणि ते जगजाहीसुद्धा होते. त्या निमित्ताने नागपूरकर मुधोजी भोसले अनेक वेळा एलिचपूरात येऊन नबाब इस्मायलखान पन्हीकडे राहत असत. नबाबांची शहा दुल्हा रहमान गाजीविशयी असलेली श्रद्धा यातूनच मुधोजी भोसलेच्या मनात शहा दुल्हा रहमान गाजीविषयी पूज्य भावना होती व त्यांची त्यावर श्रद्धा होती. तो एलिचपूरला येत असतांना नेहमी शहा दुल्हा रहमान गाझीच्या दर्शनास जात होता. "मुधोजी भोसले शहादुल्हा रहमानचा भक्त होता. त्याच्या दर्ग्यातून दर्शन घेऊन येत असतांनाच त्याच्यावर मारेकऱ्यांनी हल्ला केला होता त्यात तो जखमी झाला होता."[2] या वेळी त्याला झालेल्या जखमा दुरूस्त होई पर्यंत तो नबाबाकडेच राहीला होता.

"सेनासाहेब सुभा जानोजीच्या मृत्यूनंतर साबाजी व मुधोजीत सेनासाहेब सुभाच्या वाद वरून संघर्श निर्माण झाला. त्यावेळी मुधोजी इ.स. १७७४ मध्ये एलिचपूर येथे होता. त्याने एलिचपूरचा प्रसिसद्ध मुसलमान संत शहा रहमान गाजी याच्या दर्ग्याला नवस केला की, 'माझ्या मुलाला (दुसरा रघुजी) सेनासाहेब सुभ्याची वस्त्रे मिळाली तर दर्ग्याच्या चार बाजूंनी प्रवेशद्वार बांधीन' त्यानंतर मुधोजी आणि साबाजी यांच्यात पाचगांव येथे १७७५ मध्ये लढाईत झाली त्यात साबाजी मारला गेला त्यामुळे मुधोजीचा मार्ग निश्कंटक होऊन २४ जून १७७५ रोजी सेनासाहेब सुभ्याची वस्त्रे दुसऱ्या रघुजीस सवाई माधवराव पेशव्याकडून मिळाली. मुधोजीची इच्छा पुर्ण झाली म्हणून शहा रहमान गाजीच्या दर्ग्याला चार बाजूंनी चार प्रवेशद्वार इ.स. १७७५ ते १७७६ च्या दरम्यान बांधून त्यावर पाच शिलालेख कोरले आहेत."[3]

वरील पर्शियन भाशेतील शिलालेख अचलपूरातील धार्मिक सहिश्णूतेवर प्रकाश टाकतात. दर्ग्याच्या आत पश्चिम दरवाज्यामध्ये शिलालेख खोदला आहे. तो इ.स. १७७५–७६ चा आहे. या शिलालेखावरून ही माहिती मिळते की शहादुल्हा रहमान गाजीला व्ऱ्हाडची शान

म्हटल्या गेले आहे. या शिलालेखावरुन असे दिसते की मुधोजी भोसलेने दर्ग्याच्या आत दरवाजे बनविले ते गाविलगडचा राजपूत सरदार व किल्लेदार झामसिंगाच्या म्हणण्यावरून इजउद्दीनच्या देखरेखीखाली बांधला गेला आहे. असाच एक शिलालेख इ.स.१७७७–७६ मधील पूर्व दरवाज्यावर तो बनवल्याचा उल्लेख आहे व हा शिलालेख पर्शियन भाशेत असून कवी फरीयादचा उल्लेख आहे. उत्तर दरवाज्यावरील शिलालेखावरून तो राजा मुधोजीने बनवल्याचा उल्लेख आहे. याच मजारच्या दक्षिण दरवाज्यावर राजा रघुजी भोसले दुसरा याने मीर मेहदीच्या म्हणण्यावरुन बांधला हा मीर मेहदी अचलपूरच्या इमारती बांधण्याचा दरोगाच्या (इमारते दरोगा) हुद्द्यावर होता.[4] यावरुन असे दिसून येते की अचलपूरच्या शहा दुल्हा रहमानच्या दर्ग्यात हिंदूंचाही सहभाग आहे. हा सहभाग निर्माण होण्यासाठी भोसले व नबाबांचे धार्मिक सहिश्णूतेचे धोरणच कारणीभूत आहे. आणि या सहिश्णूतेच्या धोरणामुळेच भोसल्यांनी एलिचपूरातील एका मुस्लीम साधूच्या दर्ग्याला भिंत बांधून दिली असे दिसते.

वरीलप्रमाणेच अचलपूरात आणखी काही उल्लेख मिळतात. त्यावरुन नबाबाच्या राज्यकारभारात हिंदूंना महत्त्वाचे स्थान होते. व या धार्मिक दृष्टीकोनावर आणखी प्रकाश पडतो ते म्हणजे अचलपूरात "शहा दुल्हा रहमान गाजीच्या दर्ग्यात एक मशिद आहे. या मशिदीवर एक महत्त्वाचा शिलालेख आहे. या शिलालेखात एक हिंदू कवी राजारामने तो लिहिला आहे. मुन्शी हिरालाल मौजीस कलम हा लिहणारा होता. या ठिकाणी वैशिष्ट्यपूर्ण बाब ही आहे की, मशीदीचा शिलालेख दोन हिंदू माणसांनी लिहला आहे."[5] "श्री आनंद तेली सरमसपूरा (अचलपूर) येथील राहणारा याने हजरत शहा दुल्हा रहमान बाबाचे गुरू शेख शमसोद्दीनच्या मजारचे घुमट बांधून दिला."[6] अशा वरील उल्लेखाप्रमाणेच अचलपूरात नबाबांच्या काळात निर्माण झालेल्या वास्तूंवर अनेक लेख आहेत. त्यात हिंदूंच्या नावाचा उल्लेख मिळतो. नबाब नामदारखान पन्हीचा सासरा व वजीर मोहमद ङगत्तेखान याने जरीचा इमामवाडा बांधला. या इमामवाड्यावर जो शिलालेख आहे तो इ.स. १८११ व इ.स.१८१२ चा दिसून येतो. त्यावरुन या इमामवाड्याविशयी माहिती मिळते त्यातून नबाबांच्या धार्मिक दृष्टीकोनाचा कल सुद्धा दिसून येतो. कारण हा शिलालेख लिहिणारा कवी हिंदू आहे. नामदार बागेचे वर्श दर्शविणारा इ.स. १८१३–१४ चा शिलालेख नामदारबागेच्या समोरील दारावर लावला आहे. तो महत्त्वाचा मानला जातो कारण हा शिलालेख अचलपूरातील प्रथम उर्दू शिलालेख आहे आणि एका मुन्शी हशमतराय जानबाज नावाच्या हिंदू कवीने लिहला आहे."[7] या वरील वर्णनावरुन या काळातील धार्मिक सहिष्णूतेची भावना प्रगट होते.

### *हिंदू व मुसलीमांना दरबारात मानाचे स्थान व गोरगरीबांना अन्नदानः*

वऱ्हाडात बहूसंख्य प्रजा हिंदू आहे. राज्यकारभार करण्याच्या दृष्टीने त्यांच्यात अक्कल हुशारी अधिक आहे याची जाणीव एलिचपूरच्या नबाबांना होती. अशा लोकांचा राज्यकाराभारात उपयोग अनेक राज्यकर्त्यांनी करुन घेतलेला दिसून येतो. "एलिचपूरचे मुस्लीम नबाबांकडे अनेक हिंदू मुनशीगीरी करीत होते. काही दुसऱ्या उच्च पदावरसुद्धा कार्यरत होते."[8] अचलपूरच्या नबाबांनी त्याचा उपयोग करुन घेतला तरी त्यात धार्मिक सहिष्णूतेचा जास्त प्रभाव दिसून येतो आणि म्हणून अनेक महत्त्वाच्या जागेवर त्यांच्या नियुक्ती केल्या गेल्या होत्या. अनेक हिंदूंना एलिचपूरच्या नबाबाच्या दरबारात महत्त्वाचे स्थान होते. हे अनेक उदाहरणावरुन दिसून येते. अशा हिंदूंच्या सल्ल्याने खुद नबाब चालत होते. तसेच महत्त्वाच्या प्रसंगात त्यांची नेमणूक होत होती. आपल्यासाठी जिगिरीच्या सनदा आणण्यासाठीही हैद्राबादला या हिंदू लोकांची त्यांनी नेमणूक केली यावरुन त्यांचा त्यांच्यावरील विश्वास दिसून येतो. हा विश्वास निर्माण होण्यास नबाबांचे सहिष्णू धार्मिक धोरण जास्त कारणीभूत आहे. तसेच भोसले यांच्या दरबारातही मुसलीम होते.

एलिचपूरचे नबाब धार्मिक वृत्तीचे व दयाळू होते. याचे काही उल्लेख आढळून येतात. याला कारण त्यांचे भोसल्यांशी असलेल्या संबंधाचा तो परीणाम होता. एलिचपूरचा पहिला "नबाब इस्माईलखान याने गोरगरीबांना भोजन करण्यासाठी एलिचपूरात लंगारखाना उघडला होता."[9] यावरुन असे दिसून येते की एलिचपूरचे नबाब गोरगरीबांच्या व्यवस्थेकडे लक्ष देत असत. वऱ्हाडात नबाबांच्या काळात काही दुष्काळ पडले या वेळी या नबाबांनी गोरगरीबांना अन्नदान करण्यासाठी लंगारखाने (मोफत अन्न मिळण्याचे ठिकाण) उघडून अन्नदान केले. यामागे त्यांची धार्मिकवृत्ती दिसून येते. "नबाब सलाबखान हा सुद्धा धार्मिक वृत्तीचा होता."[10] अशा अनेक उल्लेखावरुन एलिचपूरचे नबाब धार्मिक वृत्तीचे दिसून येतात.

### *हिंदू–मुस्लीम संबंधः*

१८ व्या शतकात (नबाब काळात) हिंदू–मुसलमान यांच्यातील प्रेमभाव आणि आपुलकीच्या संबंधांचे अनुमान पुढील उदाहरणांवरुन चांगले लावले जाऊ शकते. "हजरत नसीरुद्दीन चिराग देहलवी यांच्या समाधीवर उर्सच्या दिवसात हिंदूसुद्धा मुसलमानांप्रमाणे भक्ती व श्रद्धाभावाने प्रेरीत होऊन या समाधीवर दर्शनास जात होते. दुर्गाहकुलीखाँ याने आपल्या डोळ्यांनी पाहिलेली हकीकत तो लिहितो, 'मुसलमान व हूनुद दर तकदीम शयारद यक्सानद' अर्थात हिंदू–मुसलमान दोघेही एकाच प्रकारे समाधीवर जाण्याच्या नियमाचे पालन करतात. हिंदू मुस्लीम एकतेच्या दृष्टीने देशाच्या इतर भागाप्रमाणे हा काळ वऱ्हाडचा सुवर्णकाळ होता. ........ एलिचपूर तसेच बाळापूरच्या इतिहासात या एकतेची अनेक उदाहरणे मिळतात. बाळापूरच्या 'खानकाह नक्शबंदी मध्ये आजसुद्धा एका गोसाई संताची समाधी सुङ्मी संताच्या समाधीला लागून बांधली आहे. हिंदु–मुसलमान यांच्या आपलेपणाच्या भावनेचे उदाहरण आणखी कोणते असू शकते."[11] एलिचपूर व बाळापूर या दोन्ही ठिकाणी या काळात नबाबांची सत्ता होती. ते मुस्लीम असले तरी हिंदू संतांचा आदर करीत होते असे दिसून येते. एलिचपूरच्या दक्षिणेस अंजनगाव सुर्जी नावाचे गाव आहे. या गावी दयाळनाथ नावाचे एक संतकवी होऊन गेले. ते नाथ पंथाशी संबंधित होते. "एलिचपूरचे नबाब, नागपूरकर भोसले... वगैरे लोक त्यांच्या कथेस जात"[12] या वरुन एलिचपूरचे नबाबांचे मनात हिंदू संतकवी विषयी आदर होता असे दिसून येते.

वऱ्हाडात हिंदू–मुसलमानात ऐक्य निर्माण करण्याचे कार्य तत्कालीन हिंदू व मुस्लीम साधुसंतांनी केले. याच काळात होऊन गेलेले अंजनगाव सुर्जी येथील देवनाथ महाराज चांगले कवी व कीर्तनकार होते. त्यांनी "महाराष्ट्रातील गावागावात हरीभक्तीचा प्रसार केला. ते जिथे जिथे जात तेथे तेथे हजारोच्या संख्येने त्यांचे कीर्तन ऐकण्यास लोक येत होते. अचलपूरचे नबाब, नागपूरचे भोसले, पुण्याचे पेशवा आणि

ग्वाल्हेरचे शिंदे यांना गुरु मानून त्यांना आदराने बोलावून त्यांच्या कीर्तनाचा आनंद घेत होते."[13] यांच्या कीर्तनामुळे वऱ्हाडात भक्ती प्रसार झाला. येथील मुस्लीम शासकांनी त्यांना मानाचे स्थान दिल्याने त्याचा प्रभाव येथील समाजावर पडला. त्या प्रभावामुळेच समाजात हिंदू मुस्लीम एकता निर्माण होण्यास मदत झाली.

ज्याप्रमाणे या काळात हिंदू कवी संतांनी कार्य केले त्याच प्रमाणे मुस्लीम कवी संतांनी कार्य केल्याचे दिसून येते. यामध्ये महत्त्वाचे कार्य गुलाम हुसेन एलिचपूर याचे मानले जाते. गुलाम हुसेन हा वऱ्हाडातील अत्यंत प्रसिद्ध सुफी संतकवी होता. त्या काळातील राजे व नबाब त्यांना पूज्य मानत होते. ते त्यांच्या उदार धर्मसहिष्णू भावनेमुळे सर्व धर्मियांचे श्रद्धे संत बनले होते. अनेक हिंदू व मुस्लीमांनी त्यांचे शिष्यत्त्व स्विकारले होते. "एलिचपूरचे श्रीमंत गरीब, ...... हिंदु–मुसलमान त्यांचे भक्त होते. एलिचपूरचे नबाब प्रत्येक गुरुवारी त्यांच्या दर्शनास जात होते. नबाब जे पैसे तेथे भेट देत होते ते त्याच वेळी गोरगरीबात वाटून दिल्या जात हाते."[14]

गुलाम हुसेनची ईश्वरावर भक्ती होती. त्यांनी "हिंदू–मुस्लीम एकतेवर मोठा भर दिला. त्यांनी हिंदू व मुस्लीमांना दोश दिले. ते म्हणत होते की दोघांजवळही कुराण आणि पोथी आहे. परंतु प्रेमाचे 'ढाई अक्षर' माहित नाही. हिंदू रामाचे नांव घेते तर मुसलमान अल्लाचे परंतू दोघेही ते भुलले आहे ........ दोघांच्या प्रार्थना वेगवेगळ्या असल्या तरी वेगवेगळे नाही ...... ईश्वराच्या घरी दोघेही (हिंदू–मुसलमान) एकच आहे मग येथे दुजा भाव का?[15] असे प्रबोधनाचे कार्य त्यांनी केले. साहजिकच त्याचा प्रभाव येथील शासक व समाजावर पडला. त्यामुळे सहिष्णू धार्मिक धोरण निर्माण होण्यास हातभार लागला. त्यातून या परिसरात असलेली हिंदू–मुस्लीम धार्मिक स्थळांनाही हिंदू–मुस्लीम दोघेही श्रद्धेने पूजू लागले असे अनेक उल्लेख दिसून येतात.

एलिचपूर पासून १२ कि.मी. अंतरावर बहीरम हे सिद्धपीठ तिर्थक्षेत्र आहे. येथील दैवत एका उंच टेकडी वर आहे. शेंदुर माखून–माखून देवता अवाढव्य झाली आहे. आद्यगुरु श्री शंकराचार्य माहरक्षेत्री आले असतांना त्यांनी केलेल्या निरीक्षण वरुन विदर्भ देशीचे लोक भभैरव पूजक आहेत अशी टिप्पणी केली. 'भभैरव' या शब्दाचे अपभ्रंशीत रुप 'बहीरम' असे झाले असावे. भभैरव या स्मशानदेवतेला मद्य आणि मांन्स आवडते. बहिरमच्या देवतेला मद्य आणि मांसाचा नैवद्य चढविला जातो.

बहिरम येथे दरवर्शी यात्रा भरते. "यात्रेत हिंदू–मुसलमान एका खडकाची दोन्ही बाजूंनी पुजा करतात एका बाजूने हिंदू शेंदूर, नैवेद्य अर्पण करतात, तर दुसऱ्या बाजूने मुसलमान बकरी मारुन त्यांचे रक्त शिंपडून त्यांच्या चालीप्रमाणे पूजा करतात. येथे कधीही हिंदू मुसलमानांचे तंटे झाले नाहीत. याच जिल्ह्यात उपराई या नावाचे गाव आहे. येथे शहादावल या साधुंच्या नावाने दरवर्षी यात्रा भरते. यापैकी शहा हा साधू मुसलमान होता, तर दावल हा साधू महार होता. हे मित्र असून त्यांचे एकाच वेळी निधन झाल्यामुळे त्या दोघांना एकाच जागी पुरण्यात आले. त्याच जागी यात्रा भरते."[16]

मुसलमान धर्मात बहुतेक करुन काही तरी अनिवार्य कारणांमुळे हिंदू धर्मातून लोक आले असल्यामुळे त्याचा ओढा साहजिकपणे निदान दोन, तीन पिढ्या तरी हिंदूधर्माकडे राहत असे. त्यामुळे हे मुसलमान लोक जातकम किंवा लग्न वगैरे कामात जोशी बोलावून श्रद्धेने मुहूर्त पाहतात. ही मुसलमान लोकांची संख्या मोठी आहे."[17] या विविध कारणांमुळे नबाब काळात शासनकर्त्यांनी सहिश्णू धोरणाचा अवलंब केला. किंबहूना त्यांच्यावर त्याचा प्रभाव पडला दिसून येतो. त्यातून हिंदू मुस्लीम ऐक्य साधलेले दिसून येते.

वरील विवेचना वरून दिसते की, वऱ्हाडात या काळातील भोसल्यांचा धार्मिक दृष्टीकोन कसा होता हे पाहत असतांना धार्मिक परिस्थिती सहिष्णूतेची असल्याचे आढळते. भोसले काळ आणि त्या नंतरचा काळ या दृष्टीने अभ्यासात घेतला असता हा दृष्टीकोन अधिक दृढ होतो.

***संदर्भ ग्रंथ सूची :–***

1.Sejewalkar T.S., Nagpur Affairs, Vol. Let.No.121,p.59.
2.तारीख–ए–बरार, पृ.क्र. ३५८. तारीखे अमजदीया.
3.Quddusi M. Y., Bhonsala of Nagpur and their Inscription from Ellichpur, p. 113-122. (सारांश) Quddusi M. Y., Nagpur Dates and Events, p. 15-17. (सारांश)
4.रब्बानी, अचलपूर तारीख और तखाफत, पृ. क्र. ४५,४६.
5.फनककनेप M. Y., यांचा लेख, अचलपूर तारीख और तखाफत, (रब्बानी) पृ. क्र.४५.
6.अमरावती मंडल ईद विशेषांक, १६६६, पृ. क्र. १४३.
7.Quddusi M. Y., यांचा लेख, अचलपूर तारीख और तखाफत, (रब्बानी) पृ. क्र.४५.
8.गुप्त नथ्थूलाल, विदर्भ का सांस्कृतिक इतिहास, पृ.क्र. ६६.
9.तारीख–ए–बरार, पृ.क्र. ३७४.
10. तारीख–ए–बरार, पृ.क्र. ३७२.खतीब सय्यद अमजेद हूसेन, चिरागे बरार, पृ.क्र.१०५.
11.गुप्त नथ्थूलाल, विदर्भ का सांस्कृतिक इतिहास, पृ.क्र. ६६.
12.केतकर श्री. व्यं., महाराष्ट्रीय ज्ञानकोश, वि. १५, पृ.क्र.(द) २१.
13.शुक्ला पंडित प्रयागदत्त, हिन्दी साहित्य को विदर्भ की देन, पृ.क्र ४४. विदर्भ का सांस्कृतिक इतिहास, पृ.क्र. १०८ वरुन उद्घृत.
14.गुप्त नथ्थूलाल, विदर्भ का सांस्कृतिक इतिहास, पृ.क्र. ६६.
15.गुप्त नथ्थूलाल, विदर्भ का सांस्कृतिक इतिहास, पृ.क्र. १००.
16.कोलारकर, पुरंदरे, विदर्भाचा इतिहास, पृ.क्र.२२३.
17. कोलारकर, पुरंदरे, विदर्भाचा इतिहास, पृ.क्र.२२३.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net